महाराष्ट्र विधानसभा

दिवसाच्या कामकाजाचा क्रम
शनिवार, दिनांक १ एप्रिल, २०१७
(सकाळी १०.०० वाजता)

एक : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -

(१)	वने मंत्री	:	महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळ यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा वार्षिक अहवाल व लेखा सभागृहासमोर ठेवतील.
(२)	गृहनिर्माण मंत्री	:	महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन आणि पुनर्विकास) (तक्रार निवारण समित्या) नियम, २०१५ प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक झोपसु. १००८/ प्र.क्र. १४३(१)/ झोपसु-१, दिनांकित २३ फेब्रुवारी, २०१७ सभागृहासमोर ठेवतील.
(३)	आदिवासी विकास मंत्री	:	विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये आदिवासी विकास विभागाचा सन २०१०-२०११ या वित्तीय वर्षातील योजनेत्तर आणि सन २०१०-२०११ व २०११-२०१२ या वित्तीय वर्षातील योजनातंर्गत योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवतील.
(४)	उद्योग मंत्री	:	महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचे अर्थविवरण पत्रक व कामाचा कार्यक्रम आणि सन २०१४-२०१५ या वर्षाचे सुधारीत अंदाज पत्रक सभागृहासमोर ठेवतील.

दोन : लोकलेखा समितीचा सतरावा व अठरावा अहवाल सभागृहास सादर करणे.

तीन : स्थगन प्रस्तावाच्या सूचना — (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये).

चार : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :

(१) श्री.प्रतापराव पाटील-चिखलीकर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-

"नांदेड जिल्हयातील बिलोली नगरपालिकेत दिनांक २१ फेब्रुवारी, २०१२ ते २० सप्टेंबर, २०१३ या कालावधीत तत्कालिन नगराध्यक्ष यांच्याशी संगनमत करुन मुख्याधिकारी, लेखापाल व कंत्राटी सल्लागार अभियंता यांनी रस्त्याचे काम न करता ३२ लाख रुपयांचा केलेला गैरव्यवहार, तत्कालीन नगराध्यक्ष यांच्या प्रवास भत्यावर लेखा परिक्षण अहवालामध्ये आक्षेप नोंदविल्यामुळे दिनांक २३ नोव्हेंबर, २०१६ रोजी १ लाख ४१ हजार रुपयांचा केलेला भरणा, लेखा परिक्षण व त्रिसदस्यीय चौकशी समिती यांच्या अहवालानुसार सिमेंट रस्त्यावर पाच दिवसांत ३०० ट्रक मुरूम टाकून तसेच मजूरांची बनावट नावे दाखवून त्यांना देय असलेल्या मजुरीच्या रक्कमेत सुमारे ११ लाख रुपयांचा गैरव्यवहार करण्यात येऊनही संबंधितांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात न येणे, सदर गैरव्यवहार प्रकरणी शासनाने जिल्हाधिकारी,नांदेड यांना चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे दिनांक १ ऑक्टोबर, २०१६ व ०३ जानेवारी, २०१७ रोजी आदेश देऊनही अद्याप अहवाल सादर न करणे, माजी नगराध्यक्ष, तत्कालीन नगराध्यक्ष व नगरसेवक यांनी या संदर्भात वारंवार तक्रार करुनही संबंधितांविरुध्द कोणतीच कारवाई न केल्याने उपनगराध्यक्ष यांनी या प्रकरणी शासनाने संबधिताविरुध्द कारवाई न केल्यास आत्मदहन करण्याचे मा. मुख्यमंत्री, विभागीय आयुक्त, औरंगाबाद, जिल्हाधिकारी, नांदेड यांना दिनांक १६ फेब्रुवारी, २०१७ रोजी दिलेले निवेदन, या सर्व प्रकरणाची चौकशी करुन संबंधितांविरुध्द कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(२) सर्वश्री. बाळासाहेब मुरकुटे, शिवाजीराव कर्डिले, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-

"अहमदनगर जिल्हयातील शनि शिंगनापूर देवस्थानास सन १९६३ पासून विश्वस्त नेमण्यात येऊन या देवस्थानात सध्या ३२५ अधिकारी / कर्मचारी व सुमारे १५० कर्मचारी तात्पुरत्या स्वरुपात कामावर असणे, देवस्थानाच्या कर्मचारी भरती मध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाला असून अनेक नातेवाईकांना काम न करता वेतन अदा करणे, सदर देवस्थानाचे वार्षिक उत्पन्न ४० कोटी रुपयांच्या

आसपास असून सुमारे २ कोटी भक्त दरवर्षी दर्शनासाठी येत असणे, देवस्थानाच्या विश्वस्तांनी माहे जानेवारी २०११ ते २०१५ या कालावधीत बेकायदेशीरपणे मुळा शिक्षण संस्थेस १ कोटी रुपयांची दिलेली देणगी, विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष सदर संस्थेत ग्रंथपाल म्हणून कार्यरत असल्याने सदर बेकायदेशीर कृत्य करुन देखील त्यांचेवर कोणतीच कारवाई न होणे, पानस नाला सुशोभीकरण करण्याचा आराखडा २० कोटी ५१ लाख रुपये असतांना ५० कोटी रुपये इतका वाढविणे, पंढरपूर येथील देवस्थानाच्या मालकीची इमारत व्यावसायीक तत्वावर देऊन लग्न व इतर सभारंभाचे काम मर्जीतील व्यक्तीकडे सोपविणे, दुष्काळ निधीच्या नावाखाली सुमारे ६ कोटी ७६ लाख रुपये खर्च दाखविणे, दानपेट्यांमधील रकमेचा रोज भरणा न करणे, तसेच देवस्थानच्या मालकीच्या दवाखान्यातील औषधी व इतर साहित्य, प्रसादाच्या निविदा प्रक्रिया संशयास्पद असल्यामुळे अनेकवेळा मागणी करण्यात येऊनही चौकशी न केल्यामुळे नागरिक व भक्तांमध्ये पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(३) सर्वश्री. चंद्रदीप नरके, सत्यजीत पाटील, ॲड. रामचंद्र अवसरे, श्री. चरण वाघमारे, ॲड.राहूल कुल, ॲड. भिमराव धोंडे, श्री. सुनिल शिंदे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सहकार मंत्र्याचे लक्ष वेधतील :-

"राज्यातील जवळजवळ २९ जिल्हयांमधील सर्व महाराष्ट्र राज्य कृषी व ग्रामीण विकास बँका (भुविकास बँका) अवसायनामध्ये काढण्यात आल्या असणे, सदर बँकांची सर्वच्या सर्व मालमत्ता राज्य शासनाने आपल्या ताब्यात घेतली असणे, सध्याच्या बाजारभावाने सदर मालमत्तेची किंमत जवळ जवळ २००० कोटी रुपये इतकी असणे, बँकेच्या सर्व मालमत्ता या शेतकऱ्यांच्या असणे, शासनाने बँक अवसायनामध्ये काढल्यानंतर बँकेच्या कर्मचाऱ्यांची देणी, तसेच शेतक-यांची सर्व कर्जे माफ करण्याबाबतचे आश्वासन दिले असणे, राज्यातील बँकेच्या सर्व कर्मचाऱ्यांची देणी २५० कोटी रुपये व शेतकऱ्यांची कर्जे २५० कोटी रुपये असणे, सध्या कोल्हापूर जिल्हयामध्ये शेतकऱ्यांचे ७/१२ लिलावामध्ये काढण्याची प्रक्रिया सुरु असणे, यामूळे भुविकास बँक कर्मचारी व कर्जदार शेतकरी यांच्यामध्ये पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

पाच : महाराष्ट्र विधानसभा नियम १४१(१) अन्वये मा. अध्यक्षांनी करावयाची घोषणा.

(गुरुवार, दिनांक ३० मार्च, २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)

सहा : सर्वश्री. सुनिल प्रभु, राज पुरोहित, सदा सरवणकर, ॲड. आशिष शेलार, सर्वश्री. अजय चौधरी, सुनिल शिंदे, ॲड. पराग अळवणी, सर्वश्री. रमेश लटके, योगेश सागर, तुकाराम काते, मंगेश कुडाळकर, श्रीमती तृप्ती सावंत, सर्वश्री. अमीत साटम, अशोक पाटील, अतुल भातखळकर, सुनिल राऊत, कॅ. आर. तमिल सेल्वन, सर्वश्री. प्रकाश सुर्वे, मंगलप्रभात लोढा, प्रकाश फातर्पेकर, सरदार तारासिंह, संजय पोतनीस, श्रीमती मनिषा चौधरी, श्री.संजय केळकर, वि.स.स यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर) :-

"मुंबई शहरात असलेल्या १६ हजार जुन्या उपकर प्राप्त इमारतींमध्ये ४ लाखांपेक्षा जास्त कुटुंबिय राहत असणे, त्यापैकी गेल्या ४० वर्षाच्या कालावधीत केवळ ६७२ इमारतींचा पुनर्विकास झालेला असणे, १५०० इमारती जमिनदोस्त करून तेथील सुमारे २१ हजारांपेक्षा जास्त कुटुंबिय संक्रमण शिबिरात गत १५ ते २० वर्षापासून राहत असणे, विकासकांनी पर्यायी निवासाचे मान्य केलेले भाडे व अनेक वर्षापासून थकविलेले भाडे देण्याची आवश्यकता, जुन्या इमारतीमध्ये राहणाऱ्या लाखो रहिवाश्यांच्या निवाऱ्याची व्यवस्था करणे, राज्य शासनाचे गृहनिर्माण धोरण राबविण्यामध्ये विकासकांकडून सहकार्य न मिळणे, मुंबईतील बी.पी.टी., रेल्वे इत्यादीच्या जमिनीवरील झोपडपट्टीवासियांसाठी राबविण्यात आलेल्या एसआरए गृहनिर्माण प्रकल्पांची झालेली दूरवस्था, १०० वर्षाहून जुन्या मोडकळीस आलेल्या इमारतीच्या भाडेकराराचे नुतनीकरण न झाल्यामुळे त्या इमारतीचा पुनर्विकास खोळंबला असणे व परिणामी तेथील रहिवाश्यांचे जीव धोक्यात येणे, मुंबईतील वरळी भागातील झोपडपट्टी पुनर्विकासाचे अनेक प्रलंबित प्रकल्प तातडीने पूर्ण करण्याची आवश्यकता, मुंबईतील बंद पडलेल्या गिरण्यांच्या मालकीच्या जागांवर गिरणी कामगारांना घरे बांधून देण्याच्या योजनेला गती देणे, बोरीवली संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या सर्व्हे नं. २३९/१ या वन क्षेत्राची मोजणी करून अतिक्रमणांचे त्याच क्षेत्रात पुनर्वसन करण्याबाबत दिंडोशी येथील लोकप्रतिनिधींनी माहे डिसेंबर, २०१६ मध्ये मा.मुख्यमंत्री, मा.वनमंत्री, मा.गृहनिर्माण मंत्री, मा.वन राज्यमंत्री यांचेकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी करणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही विचारात घेण्यात यावी."

सात : शासकीय विधेयके :

(अ) पुर:स्थापनार्थ :-

(१) सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक २४ — महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य (निरर्हता दूर करणे) (सुधारणा) विधेयक, २०१७.

(२) सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक २५ - विश्वकर्मा विद्यापीठ विधेयक, २०१७.

(३) सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक २६ - डिएसके विश्व विद्यापीठ विधेयक, २०१७.

(ब) विचार, खंडश: विचार व संमत करणे :-

(१) (क) सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक २३ - महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) विधेयक, २०१७.

(ख) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.अस्लम शेख, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक २३ — महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

(२) (क) सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक १९ — महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१७.

(ख) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.अस्लम शेख, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक १९ — महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

(३) (क) सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक २० — भारतीय दंड संहिता आणि फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१७.

(ख) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.अस्लम शेख, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक २० — भारतीय दंड संहिता आणि फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

अशासकीय कामकाज

(बैठकीच्या अखेरचे २ १/२ तास)

आठ : अशासकीय विधेयके :-

विचारार्थ :

(शुक्रवार, दिनांक ३१ मार्च, २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु, पुढे ढकलण्यात आलेली विधेयके - क्रमांक १ ते ४)

(१) सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक ३३ - मुंबई महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१६ - श्री.मंगलप्रभात लोढा, वि.स.स. यांचे.

(२) सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक ४५ - महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१६ - श्री.मनोहर भोईर, वि.स.स. यांचे.

(३) सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक १२ - महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) विधेयक, २०१६ - श्री.सुनिल प्रभु, वि.स.स. यांचे.

(४) सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक ५२ - महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन (चौथी सुधारणा) विधेयक, २०१६- श्री.मनोहर भोईर, वि.स.स. यांचे.

विधान भवन,
मुंबई,
दिनांक : ३१ मार्च, २०१७

डॉ. अनंत कळसे,
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.